# प्र क र ण सहावे

6 वे

## उपसंहार

## * प्र क र ण – 6 वे *

### उपसंहार

'मनोबोध किंवा 'मनाचे श्लोक' हे समर्थांचे स्फुट प्रकरण आपल्या सर्वांच्या परिचयाचे आहे. आज 300 ते 350 वर्षे होवूनही समर्थांच्या 'मनोबोधा' ची संजीवनी आपणा सर्वांना मोहित करते आहे, आपल्या मनाला भुरळ घालते आहे. ज्याला एखादा तरी मनाचा श्लोक पाठ येत नाही असा माणूस महाराष्ट्रात तरी सापडणे कठीण आहे. लहान मुलांपासून ते आबाल वृद्धांपर्यंत मनाचे श्लोक सर्वांना माहित आहेत. हेच या श्लोकांचे मोठेपण आहे. मनाचे श्लोक या नावाने ओळखला जाणारा हा ग्रंथ जरी 205 श्लोकसंख्या इतका लहान असला तरी तो सखोल विचारांनी संपन्न आहे. या ग्रंथात समर्थांनी आपल्या मनाशी म्हणजे स्वतःशी केलेला संवाद आहे. म्हणजेच आत्मसंवाद आहे. या श्लोकांची रचना समर्थांनी भुजंगप्रयात या वृत्तात केलेली आहे. त्यांनी याला 'मनाची शते' असे म्हटले आहे. समर्थ संप्रदायातील यशवंत महाराज यांनी आरतीच्या निमित्ताने याला 'मनोबोध' असे नाव दिले आहे. याचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्रात अनेक संत होऊन गेले. त्या सर्वांहून रामदास हे वेगळे संत होते. त्यांनी परमार्थाबरोबर प्रपंचही करावा अशी शिकवण दिली. इतर सर्व संतानी परमार्थाचाच उपदेश केला आहे. परंतु रामदासांनी मात्र परमार्थाबरोबरीने प्रपंचही महत्वाचा मानला आहे. त्यांनी केलेल्या प्रवृत्तीमार्गाच्याउपदेशामुळे मरगळलेल्या समाजात चैतन्य निर्माण झाले. 'आधी प्रपंच करावा नेटका' म्हणून त्यांनी प्रपंचविज्ञानही सांगितले. हरिकथा-निरुपणाबरोबर त्यांनी राजकारण व्यवहारचातुर्य आणि सावधपण यालाही आपल्या उपदेशात स्थान दिले आहे. त्यांना प्रपंचाची होणारी आबाळ मान्य नव्हती. सर्व संताहून समर्थांचे वेगळेपण यातूनच दिसून येते.

ज्याप्रमाणे समर्थांनी 'मनाचे श्लोक' लिहिले आहेत त्याचप्रमाणे नामदेवांनीही 'मनास उपदेश' केला आहे. नामदेव हे समाज – सहृदय होते, तर रामदास हे प्रबोधनकार होते. ते नामदेव मनाला अनेक प्रश्न विचारुन त्याला परोपरीने विनवणी करतात. मनाला अतिशय हळुवारपणे जागे करुन वाटेवर आणण्याचा प्रयत्न करतात आणि त्याला जागेवर आणण्याचा प्रयत्न करतात. ते मनास 'अरे अलगटा माझिया तू मनां । किती रानोराना हिंडविसी।।' असे नाना प्रश्न ते मनाला विचारतात. तर रामदास मात्र 'मना वीट मानू नको बोलण्याचा अशी मनाची विनवणी करतात. प्रपंचविज्ञान, क्षात्रधर्म, राजकारण, परमार्थ या सर्वांचे महत्व ते

शिक्षकाच्या भूमिकेतून समजावून सांगतात. एखादा विचार समाजमनावर बिंबवण्यासाठी ते त्याची उमजून पुनरुक्ती करतात. तर नानदेव काही अभंगात प्रेमाने आपल्या मुलाला कुशीत घेणा–या आईच्या भूमिकेतून समजावून सांगतात. त्यामुळे त्यांच्या अभंगातून वात्सल्य, जिव्हाळा ओतप्रोत भरलेला दिसतो. नामाचे महत्व दोघांनाही मान्य आहे. रामदासांच्या मते नाम घ्यायचे ते अतिआदरपूर्वक घ्यावे, त्याचा जयघोष करावा व ते स्पष्टपणे घ्यावे. असे नाम घेतले तर श्रीहरी पावेल हा त्यांचा नामावर असलेला विश्वास आहे. ते महणतात, 'मना मत्सरें नाम सांडू नको हो।' त्यांच्याप्रमाणे नामदेवांचाही विश्वास नामाच्या सामर्थ्यावर आहे. नामामुळे साधकाला सामर्थ्य प्राप्त होते. नाम घेणा–या साधकाला कशाचेही भय वाटत नाही. त्याच्यामुळे आत्मसाक्षात्कार होऊ शकतो. परंतू जे सद्‌गुरुकृपेशिवाय सार्थकी होत नाही. त्याच्या ठिकाणी तू – मी असा भेदभाव शिल्लकच राहात नाही. त्याच्या ठिकाणी मन एकाकार होते. म्हणून नामदेव महणतात, 'वेद्रीं तोचि शास्त्रीं सर्वाठायी तोचि। पुराणांत तोचि अंतःकरणीं। नाम सदा ध्यानीं नाम सदा ध्यायी । रामनाम ध्यायीं अरे मना ।।'

रामदास मनाच्या श्लोकांतून सगुण आणि निर्गुण अशा परमात्मस्वरुप परमेश्वराची ओळख करुन देतात. मनाच्या श्लोकांच्या पूर्वार्धात सगुण आणि निगुर्ण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, राम आणि ब्रह्म हे दोन नसुन एकच आहेत. या संसाराच्या चक्रातून मुक्त होण्यासाठी सगुण भक्ती करावी असे त्यांनी प्रतिपादन केले आहे. उत्तरार्धात मात्र त्यांनी निर्गुण भक्तीचेच महात्म वर्णन केले आहे. नामदेव हे रामदासांसारखे काही सिध्द करत नाहीत. तर त्यांच्या वाटयाला जे दुःख आले, त्यानी जे भोगले ते त्यांनी शब्दबध्द करून ते यथार्थपणे मांडले आहे. त्यांच्या अभंगात सर्वांना अंतमुख करण्याचे सामर्थ्य आहे. मनाच्या श्लोकांत रामदासांनी आयुष्यभर केलेले चिंतन दिसते. तर नामदेवाच्या 'मनास उपदेश' यात त्यांचा अनुभव प्रतिबिंबित झालेला दिसतो.

वारकरी संप्रदाय आणि समर्थ संप्रदाय या दोन्ही संप्रदायात बरेचसे साम्य आहे. दोन्ही संप्रदायांचा कर्मयोगावर दृढ विश्वास आहे. विशाल आणि व्यापक अशा वैदिक धर्माचेच विकसीत रूप म्हणजे भागवत धर्म होय. हा भागवत धर्म म्हणजेच महाराष्ट्रीय संतांचा वारकरी संप्रदाय होय. या भागवत धर्माचाच खळाळून वाहणारा स्वतंत्र प्रवाह म्हणजे समर्थ संप्रदाय होय. हा स्वरूप संप्रदायाच्या मार्फत स्थापना केला. ज्ञानेश्वरादी वारकरी संतांचा श्री विठ्ठल आणि समर्थांचा श्रीराम

ही दोन्हीही दैवते श्री विष्णूचाच अंश आहेत. म्हणून वारकरी संप्रदाय आणि समर्थ संप्रदाय या दोन्ही संप्रदायाच्या मुलभूत प्रेरणा, त्यांचे स्वरूप आणि त्यांची विचारसरणी एकच होती. वारकरी संप्रदाय आणि समर्थ संप्रदायात नामःस्मरण आणि भक्ती सारखीच सांगितली आहे. वारकरी व समर्थ संप्रदायात तुलना करत असताना या दोन्ही संप्रदायांची परमार्थाविषयी असणारी दृष्टी लक्षात घेतली असता या दोन्ही संप्रदायात मुलभूत असा काहीच फरक नाही असे लक्षात येते. ज्ञानेश्वरांच्या कार्याची मुलभूत प्रेरणा 'ब्रह्ममविद्येचा सुकाळ' आणि 'अध्यात्म' ही होत. तर रामदासांना प्रत्येक कार्यत 'भगवंताचे अधिष्ठन' असणे गरजेचे वाटत होते.

रामदासांवर ब्राह्मणांचे पक्षपाती असल्याचा जो आक्षेप घेतला जातो तो कितपत योग्य आहे? रामदासांच्या शिकवणुकीचा आणि कार्याचा परमार्थ हाच 'आत्मा' आहे. यांनी परमाथमार्गात फक्त ब्राह्मणांनाच अधिकारी मानले नसून इतर वर्णीयांना त्यापासून वेगळे ठेवले असे काही झालेले नाही. किंवा तसे झाल्याचा पुरावाही कुठे मिळत नाही. असे असुन सुद्धा ज्ञानदेवादी संतानी सांगितलेल्या समानतेच्या वाटेवर ब्राह्मणांचे वर्चस्व सांगणारे समर्थ प्रतिगामी तरी कसे ठरतील ? रामदास शिष्यांची लक्षणे सांगत असताना शिष्य ब्राह्मण असावा असे कुठेही सांगताना दिसत नाहीत. त्यांनी बारा वर्षे भारतभ्रमण केले. त्यावेळी त्यांनी धर्म आणि लोकस्थितीचा अभ्यास केला. त्यांनी हरिकथानिरुपणाला प्रथम व राजकारणाला दुसरे स्थान दिले होते. कारण स्वधर्म हा स्वराज्यावर आधारीत असतो.

स्वराज्य जर निर्माण करावयाचे असेल तर समाजाच्या मनात स्वधर्माविषयी प्रेम निर्माण करणे गरजेचे असते. हे कार्य करण्यासाठी त्यावेळचा ब्राह्मण समाज अधिक कार्यप्रवरण होता. म्हणून रामदासांनी काही वेळा ब्राह्मणांचा पुरस्कार केलेला दिसून येतो. त्यांचे हे करणे व्यवहारदृष्टया योग्यच होते. समर्थांप्रमाणेच एकनाथही ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व सांगताना दिसतात. नाथ भागवतात त्यांनी ठिकठिकाणी ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व वर्णन केलेले आहे. तरी त्यांच्यावर कोणी ते ब्राह्मणांचे पक्षपाती असल्याचा आरोप केला नाही. एखाद्या विशिष्ट कालखंडाला वेगळे वळण लावण्यासाठी त्या कालखंडातील संत कसोशीने प्रयत्न करत असतात. परंतू त्या समाजाची जी जीवननीष्ठा असते ती त्यांना तशीच्या तशी स्विकारणे क्रमप्राप्त ठरते.

समाजातील भौतिकवादाचे स्थान परिपूर्णपणे ओळखणारे आणि त्याचप्रमाणे विचार व्यक्त करणारे समर्थ रामदास हे अपवादात्मक संत होते. त्यांनी आयुष्याच्या शेवटच्या घडी पर्यंत लिखाण केले. त्यांच्या आयुष्याबरोबरच त्यांचे लिखाण विराम पावले. त्यांनी लिहलेले साहित्य हे सर्व

साहित्यिकांना आव्हान ठरावे असेच आहे. समर्थ वाड्.मयावर अनेक मान्यवर अशा अभ्यासकांना यापूर्वी अभ्यास केला आहे. समर्थ रामदासांचे लिखाण हे इतर सर्व संतांपेक्षा वेगळे आहे. मनोबोध हे त्यांचे स्फुट काव्य आहे. त्यात समर्थांनी मनास केलेला उपदेश आहे. मनाच्या श्लोकांचा स्वतंत्रपणे आणि वैचारिकरितीने अभ्यास होणे गरजेचे आहे.

मनाच्या श्लोकांची रचना रामदासांनी आपल्या आयुष्याच्या अखेरच्या काळात केलेली दिसते. चाफळ येथील रामजन्मोत्सवा .साठीशिवाजी महाराजांकडून येणारी शिधा सामुग्री काही कारणारे आली नाही. उत्सव तर नजदिक येऊन ठेपलेला. सर्व शिष्यांना म्हणणे पडले की शिवाजी महाराजांना स्मरणपत्र पाठवावे. परंतू समर्थांनी त्यांच्या या म्हणण्यावर सांगितले की, ' तुम्ही चिंता कशाला करता? सा--या विश्वाची चिंता करणा--या रामरायांचा उत्सव आहे. ते स्वतः उत्सव पार पाडतील'. शिष्यांना जरी असे सांगितले असेल तरी त्यांच्या मनात मात्र प्रचंड कोलाहल माजला होता. एका रात्री शांत वेळी रामदासांनी आपला प्रिय शिष्य कल्याण यास हाक मारून लिहिण्यास सांगितले. तेच हे 205 'भुजंगप्रयात' या वृत्तात असलेले मनाचे श्लोक होय. हे श्लोक गावोगावी जाऊन मोठया आवाजात म्हणून भिक्षा गोळा केली गेली. या श्लोकांनाही चांगला प्रतिसाद मिळाला. अशी मनाच्या श्लोकांची रचना झाली असावी अशी कथा प्रचलीत आहे. परंतु ही कथा खरी नसावी कारण हे श्लोक नुसत्या भिक्षेसाठी रचल्यासारखे दिसत नाहीत. आज ते त्या कामी योजले जातात. या श्लोकांची रचना कवीच्या परिणतप्रज्ञ अवस्थेत झाली असावी. याचा रचनाकाळ निश्चितपणे सांगता येत नाही.

समर्थ रामदास स्वामींचा जन्म शके 1530 कीलक नाम संवत्सरे चैत्र शुध्द नवमीस माध्यान्हीच्या वेळी जांब या गावी झाला. त्यांचे नाव नारायण असे ठेवण्यात आले. नारायण हा जात्याच खोडकर होता. त्याला भीती अशी माहितीच नव्हती. नारायण बालवयातच अंर्तमुख आणि चिंतनशील होता.लहान असताना 'चिंता करतो विश्वाची ' म्हणणा--या या मुलाने खरोखरच पुढे आयुष्यभर विश्वाची चिंता केली. वयाच्या बाराव्या वर्षी त्याने 'सावधान' हा शब्द ऐकताच जे पलायन केले ते थेट तो नाशिकला जाऊन थांबला. नाशिक जवळ गोदावरी व नंदिनी यांच्या संगमावर असलेल्या टाकळी या गावी त्यांनी पुढे बारा वर्षे पुनश्चरण आणि अध्यायन केले. त्यानंतर त्यांनी बारा वर्षे आसेतुहिमाचल भारत बघितला. म्हणजे तीर्थयात्रा केली. तीर्थयात्रेला निघण्यापूर्वी त्यांनी टाकळीस पहिल्या मारूतीची स्थापना केली. याच सुमारास त्यांना पहिला शिष्य उध्दव हा मिळाला. बारा वर्षे बालपण, बारा वर्षे पूरश्चीण आणि बारा वर्षे तीर्थयात्रा अशी तीन तपे साधकावस्थेत घालवून समर्थ आता पुर्णप्रज्ञ बनले होते. त्यांनी आपल्या कार्यासाठी सह्याद्रीचा प्रदेश

निवडला. येथेच त्यांना त्यांच्या आवडीचा निसर्ग, निसर्गाचे सौंदर्य व हवाहवासा वाटणारा एकांत मिळाला. कृष्णातीरावरील मसुरला त्यांनी अकरा मारूतीतील पहिल्या मारूतीची स्थापना केली आणि प्रथम येथे रामनवमीचा उत्सव त्यांनी मोठया थाटामाठात सुरू केला. चाफळला शके 1570 ला श्रीरामाचे मंदिर बांधले. याच दरम्यान त्यांना विवीध शिष्य शिष्या मिळाल्या. शके 1571 मध्ये समर्थ पंढरपूरला जाऊन आले. तेथे त्यांनी विठ्ठलाच्या ठिकाणी रामाचेच दर्शन झाले. तेथेच तुकाराम महाराजांची पहिली आणि शेवटची भेट झाली. शके 1577 ला शिवरायांनी आपले राज्य समर्थांच्या झोळीत टाकले. त्यांनी आपल्या आयुष्याचा शेवटचा काळ सज्जन गडावरच घालवीला. शके 1603 माघ कृष्ण नवमीस श्रीरामाचा अखंड घोष करीत सज्जनगडावरच आपला देह ठेवला.

दासबोध, मनाचे श्लोक आणि करूणाष्टके यांना समर्थ साहित्यात वेगळेच स्थान प्राप्त झाले आहे. त्यांच्या दासबोधात भक्तीचे तत्वदर्शन, मनाच्या श्लोकांत भक्तीसाधणाचे दिग्दर्शन आणि करूणाष्टकांत भक्ती भावनेचे संप्रेषण आपल्याप्रत्ययास येते.

मनाचे श्लोक मराठी भाषिकांत अतिशय लोकप्रिय झाले आहेत कारण समर्थ रामदासांनी भक्तीचे तत्वज्ञान प्रत्यक्ष व्यवहारात कसे आणावे याचे सुंदर असे विवेचन अतिशय सोप्या व सुंदर शब्दात केले आहे. मनाच्या श्लोकांतील शिकवण नीट समजण्याच्या दृष्टीने निरनिराळया अभ्यासकांनी निरनिराळया पध्दतीने त्याचे विभाग पाडले आहेत.ते पाडणे गरजेचे असले तरी खळाळत्या झ–याप्रमाणे असणा–या या काव्यरचनेला निबंधाचा बंदिस्तपणा येणे कधीही शक्य नाही. मनोबोध हा विश्व, मानव आणि मानवसमूह याच्या संदर्भात मान्य केलेल्या काही मुलभूत अशा तत्वावर आधारीत आहे. हे मनाचे श्लोक वाचत असताना जाणवत राहते. या तत्वांना वेद–उपनिषदे यात असलेल्या परंपरेचा आधार आहे. मनाच्या श्लोकांत आलेल्या भाषेवरून आणि त्यांनी त्यात दिलेल्या उदाहरणांवरून रामदासांनी अद्वैत वेदांचा स्विकार केला होता असे दिसून येते. मानवाचे अंतिम साध्य परमेश्वराची प्राप्ती असल्यामुळे त्या ईश्वराशी तद्रुप होण्यातच मानवी जीवनाची सार्थकता आहे. हें ज्ञात होणे म्हणजेच आत्मज्ञान होणे होय. अशा आत्मज्ञानाला पुरक आणि पोषक वातावरणाची निर्मिती करणे आणि ती आनंददायक राखणे हाच संपूर्ण मानव जातीचा धर्म आहे. नव्हे ते त्यांचे परमकर्तव्य आहे. या तीन मुलभूत अशा तत्वांभोवती संपूर्ण मनाच्या श्लोकांचा विचार व्युहं रचना गेला आहे.

समर्थ रामदास हे जातीवंत शिक्षक असल्याने त्यांनी मनाला समजवण्यासाठी आपले सर्व कौशल्य पणाला लावले आहे. मानवी जीवनात एका परमेश्वराशिवाय काहीहीनाही. जर त्याला

मनापासून साद घातली तर तो आपल्या मदतीला आल्याशिवाय राहत नाही. असा पूर्ण विश्वासरामदास व्यक्त करतात. माणसाच्या जगण्याला ते नवा अर्थ प्राप्त करून देतात. मीपणाच्या अहंकाराचा त्याग केला की मानवाला त्या निर्गुण निराकार अशा परमेश्वराची प्राप्ती सहज होते. हे मुलभूत तत्व सम्र्थांनी स्वतःच सांगून ठेवले आहे. त्यालाच त्यांनी 'भक्ती पंथ' असेही म्हटले आहे. यालाच भक्तीयोग ज्ञान, कर्म, योग या सर्वांचा विरोधी नसुन त्या सर्वांना आपल्यात सामावून घेणार असा जीवनव्यापी समन्वय योग आहे. सम्र्थांनी सांगितलेली संकल्पना सखोल, विशाल, भव्योदात्त आणि सर्वस्पर्शी आहे. भक्तीची भावना मानवी जीवनातील विविध अंगांना कशी प्रभावित करते याचे हुबेहुब चित्र सम्र्थांनी मांडले आहे. सम्र्थांनी सांगितलेली भक्तीयोगाची निदान आठ अंगे मनाच्या श्लोकांत असल्याचे दिसून येतात. विश्वास किंवा श्रध्दा, निती किंवा सदाचार, नामःस्मरण, विवेक, वैराग्य, सज्जन आणि सद्‌गुरू यांची संगती, कृतिशीलता, स्वरूपज्ञान आणि स्वरूपानंद ही ती आठ अंगे होत. सम्र्थांनी मनाच्या श्लोकांत जो भक्तीयोग सांगितला आहे तो मानवी जीवनातील दुःखातून आनंद प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी सांगितलेला एक साधा, सोपा मार्ग आहे. मनाच्या श्लोकांत रामदासांनी समर्पण भावनेचा गंभीर, खोल आणि जीवनव्यापी अर्थ सांगितला आहे. त्यांनी सांगितलेला भक्तीयोग हा मानवी जीवनाला उच्च पातळीवर घेऊन जातो. त्यामुळे ज्ञान वैराग्य आणि सामर्थ्य निर्माण होते. मानवाच्या जीवनाचे अंतीम ध्येय ईश्वरार्पण भावनेतच आहे. म्हणून त्याला समर्पण योग असेही म्हणता येईल. हा योग सहज साध्य होत नाही तसाच तो असाध्यही नाही. 'क्षयातीत तो अक्षयी मोक्ष देतो । दयादक्ष तो साक्षिने पक्ष घेतो ।' असा परमेश्वरावरील आपला विश्वास श्री सम्र्थ रामदासांनी व्यक्त केला आहे.

माणसाचे मन आहे तरी कसे ? मन हे बेलगाम घोडयाप्रमाणे असते. ते सतत चौफेर उधळत असते. त्याला ताब्यात ठेवण्यासाठी त्याला साधनेचा आणि नामस्मरणाचे लगाम घालणे आवश्यक असते. जो माणूस हा लगाम घालण्यात यशस्वी होतो म्हणजे मनावर जो विजय मिळवितो तोच मानव श्रेष्ठत्व पावतो. मानवाला प्रगल्भ असे मन असते. तो मनन आणि चिंतन करुन सारासार विचार करणारा प्राणी आहे. मानवाच्या प्रगतीला किंवा अधोगतीला त्याचे मनच कारणीभूत असते. जो माणूस मनावर विजय मिळंवितो तोच खरा साधुपुरुष होय. मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार ही कारणपरत्वे कल्पनेला दिली जाणारी नावे आहेत. त्याला ज्या साच्यात घालाल त्याप्रमाणे ते बनत असते. मनाची वृत्तीद्वारा अंतर्मुखता प्राप्त करुन घेऊन आत्मशोध करणे म्हणजेच मनाचेच मनावर ताबा मिळविणे होय. याला परमार्थ असेही म्हटले जाते. या मनामुळेच माणूस
करुन घेतो. या चंचल मनाला सावरुन रामरुपामध्ये एकाग्र
संसारापाशा अडकतो. आणि मनामुळे तो त्यापासून सुटका कसे करावे याची शिकवण रामदासांनी मनाच्या श्लोकांत दिली आहे.

समर्थांनी आपल्या मनाला जो उपदेश केला तो म्हणजेच 'मनाचे श्लोक' होय. यात पहिला श्लोक मंगलचरणाचा आहे. त्यात त्यांनी गणपती आणि शारदा यांना वंदन केले आहे. पुढील श्लोकांत त्यांनी विवेक वैराग्याचे उद्बोधन केले आहे. सुरुवातीला काही श्लोकांत त्यांनी हरीभक्ती आणि सदाचार सांगितला आहे. तो समजावून देताना ते महणतात, 'सज्जन मना, परमेश्वराची प्राप्ती होण्यासाठी तू भक्तिमार्गानेच वाटचाल कर. सकाळच्या वेळी देवाचे नांव घेत जा. दुष्ट वासना आणि पापबुद्धी यांना कधीही आपल्या जवळ येऊ देऊ नको. जगात वावरत असताना नीती आणि धर्म कधीही सोडू नकोस ; यापुढील श्लोकांत त्यांनी विवेक वैराग्याची महती वर्णन केली आहे. ते सांगतात, ' या जगात सर्वसुखी असा कोणी नाही. प्रत्येकाला कर्मभोग हा भोगावाच लागतो. म्हणून हे मना तू स्वतःजवळ दुःखाला कधीही येऊ देऊ नकोस. उगाच चिंता करीत बसू नकोस. विवेकाने देहबुद्धी सोडून विदेहीपणे मुक्तसुख भोगीत रहा. वासना ही सर्वनाशास कारण होते तिचा त्याग कर. फक्त राममय होण्याचीच वासना मनात धर. तो श्रीराम तुझी कधीही उपेक्षा करणार नाही.

येथून पुढे रामदासांनी सगुणभक्तीचे महत्त्व सांगितले आहे. सगुणभक्ती केल्याने तो रामराय आपल्या भक्तांचे संरक्षण करतो. म्हणून हे मना तू राघवाचेच ध्यान सदा सर्वकाळ करत रहा. तू काया वाचा मनाने फक्त त्याचेच स्मरण करीत रहा. त्याची कधीही अवज्ञा करु नकोस. तू त्या राघवास आपलासा करुन घे. मना, लोकांमध्ये मौन धारण कर. रामरायाची कथा मात्र आदरपूर्वक सांगत रहा. आत्मसुखासाठी एकांतवास कर. येथून पुढे भगवंताच्या खऱ्या दासाची लक्षणे सांगितली आहेत. जो सदा सर्वकाळ देवाचे नाम घेण्यातच आपले आयुष्य खर्च करतो. सद्गुणी बनून निर्गुणाची कास जो धरतो, जगात वावरताना जो सदा जागरुक असतो, त्यालाच श्रीहरिचे दर्शन घडते. तोच उत्तम दास होय. आपल्या दासाचे पालन तो दीनदयाळू परमात्मा करतच असतो. घनश्याम, लावण्यरुप, धीरगंभीर, पूर्णप्रतापी अशा श्रीरामाचे सदासर्वकाळ ध्यान कर. मद आणि आळस सोडून त्यांचे चिंतन करीत जा. त्याचे चिंतन करायला किंवा त्याचे नाम घ्यायला काहीही खर्च होत नाही. एकदा का रामनामावर विश्वास निर्माण झाला की सर्व ठिकाणी रामच दिसू लागतो. महातापसी आणि योगी असा शंकर सुद्धा ज्याला आपल्या हृदयात स्थान देऊन सदैव भजत असतो, अशा श्रीरामवर तू सर्व भार सोड. त्याचे सदैव नाम घेत जा. त्याच्या नुसत्या नावाने पाषाण सुद्धा तरले जातात. तर मग मानव हा तर सचेतन प्राणी आहे. अनेक मानव नुसत्या नामानेच तरले आहेत. नाम घेताना काही पथ्ये पाळावी लागतात. परद्रव्य आणि परस्त्री यांचा संबंध नसावा,

आपल्या जवळ अहंकाराला जागा देवू नये, क्रियेवीण बोलू नये, वादविवाद करु नये, संवाद साधावा, नित्यकर्म आदरपूर्वक व निष्ठापूर्वक करावीत म्हणून हे मना बोलल्याप्रमाणे वाग. राम आपल्या भक्तांची कधीच उपेक्षा करत नाही. अंबरीष, उपमन्यु, ध्रुव, प्रल्हाद, गजेंद्र, अजामील या सर्वांच्या उद्हरणांवरुन असे दिसते की देव भक्तांच्या हाकेसरशी संकटात उडी घेतो व आपल्या भक्तांना वाचवतो. म्हणून हे मना तू त्यांचीच भक्ती कर.

समर्थांनी आतापर्यंत सगुण भक्तीचा मार्ग सांगितला असून निर्गुण भक्तीची ओळख ते येथून पुढे करुन देतात. सगुण आणि निर्गुण यात काहीच फरक नाही. त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. राम तोच ब्रह्म आणि ब्रह्म तोच राम होय. निर्गुण ब्रह्म संत, अनंत व भयातीत आहे. तेथे द्वैत नाही. त्यामुळे भयही नाही. मीपणाचा अहंकार सोडला की निर्गुण परब्रह्माची प्राप्ती होते. या प्राप्तीमुळे द्वैतभावनांचा विनाश होतो. ज्याच्या जवळ द्वैतभावना नाही तो पुरुष संतत्व पावतो. या संतानी परमेश्वर प्राप्तीचे सुकर मार्ग सांगितले असले तरी अज्ञानी जीव मात्र त्या वाटेने न जाता अज्ञानातच गुरफटलेले राहतात. देहबुद्धीने केली जाणारी कर्मे करीत राहतात. त्यामुळे पूर्वजांनी आत्मज्ञानरुपी धन ठेवलेले असून तेही दिसत नाही. ते धन गुप्त झाल्यासारखे भासते. मनात असलेला देहभाव ज्याला सुटत नाही, त्याला मीपणाचा अहंकारही टाळता येत नाही. जीव त्रिगुणांच्या बंधनात अडकून पडतो. त्याला त्या बंधनातून सोडविण्यास एका परमेश्वरावाचून कोणीही नाही. आणि परमेश्वराकडे आपल्याला नेण्याला एका सद्गुरुवाचून कोणीही नाही. 'गुरुअंजनेवीण ते आकलेना' या जगात सत्यासत्य पारखून घ्यावे. विवेकाने आत्मरुपामध्ये विलीन व्हावे. हे जग जेथून निर्माण झाले त्या परब्रह्माशी एकरुप झाल्यास जीव मुक्त होतो. शाश्वत सत्स्वरुप तेच एकमेव सत्य होय. म्हणून त्या सत्स्वरुपाशी एकाकार होऊन रहा. ते नित्यस्वरुप नुसत्या डोळयांनी दिसत नाही. तर ज्ञानदृष्टीने पाहिले असता सर्वत्र तेच नित्यसस्वरुप भरुन राहिल्याचे जाणवते. तेव्हा हे मना, एकदा तरी त्या नित्यसत्स्वरुप अनंताचा तू – मी असा भेदभाव न करता शोध घे. म्हणजे तुला तू आणि ते एकच आहात असे जाणवेल तू त्याच्यात तदाकार होऊन जाशील. अष्टांगयोग, विषयोपभोग आणि त्याग इ. कर्मकांड केल्याने शांती मिळेलच असे नाही. तर शांती मिळविण्यासाठी सज्जनांचा सहवास आवश्यक आहे. उपनिषदे, न्यायशास्त्रे, मीमांसा तर्कशास्त्रे, धर्मशास्त्रे, वेद या सर्वातून त्या परमात्मस्वरुपाचे वर्णन केलेले असते. पण तेही अपुरे आहे हे लक्षात आल्यावर सहस्त्र मुखाच्या शेषानेही मौन धारण केले. म्हणून हे मना मी ज्ञानी आहे हा अहंकार सोडून तू त्या परमात्म स्वरुपाशी तदाकार होऊन रहा.

देहबुद्धीला आत्मबुद्धीत विलीन करण्यासाठी मन ज्या विषयाची कल्पना करील तो विषय मनानेच दूर करावा. मोकळया मनाने निर्गुण निराकार आत्मदेवाचें स्वरुप ओळखावे. एकदा का तिची ओळख पटली की मन त्याच्या ठिकाणी एकाकार होते. तू सदैव हरिचिंतन केल्याने मुक्त होशील. सगुण रुपात जो निर्गुण परमात्मा वास करतो त्याला बघण्याची सवय ठेव. मात्र संसृतीस कारण जो वेगळेपणा त्याची संगत करु नकोस. त्या कल्पनारहीत परब्रह्माचे सदैव चिंतन करीत रहा. मीपणाचा अहंकार कणभर जरी मनात शिल्लक राहिला तरी त्या परब्रह्माचे यथार्थ आकलन होऊ शकत नाही. ते परमात्मस्वरुप दृश्य व अदृश्यही नाही. वेदांनातर त्यांचा अंतपारही लागला नाही. श्रुतींनाही त्यांचा अंतपार न लागल्याने नेति – नेति म्हणत स्वस्थ बसावे लागले. त्या परमात्म्याचे स्वरुप गुप्त, रहस्यमय व स्थिर आहे. त्याच्या ठिकाणी दुजेपणा नाही. ही खूण गुरुकृपेशिवाय कळून येत नाही. एकदा का त्या राघवाचे रुप दिसले की पूर्णज्ञान होते. आणि त्याचे वर्णन करायला शब्द अपूरे पडतात. एकदा का परमात्म्याची भेट झाली की अहंकाररुपी मीपणा गळून पडतो. त्यामुहे देहाचे भान हरपून जाते. आणि त्यास पूर्ण शांती लाभते.

हे मना, साक्षातकाराचे गुपीत तुला समजले आहे. ही साक्षात्काररुपी ज्ञानज्योत सतत तेवत ठेवण्यासाठी तुला सतत प्रयत्नांची पराकाष्टा केली पाहिजे. सतत श्रवण – मनन केल्याने आत्मबुद्धीचा उदय होतो. म्हणून संताची संगती धर. संताच्या संगतीमुळे मोक्ष ही तात्काळ मिळतो. येथू पुढे रामदासांनी या ग्रंथाची फलश्रुती सांगितली आहे. ही मनाची शते जर श्रद्धेने ऐकली, अभ्यासली, समजावून घेतली तर सर्व दोष नाहिसे होतील. मतिमंद माणसेही साधनाला योग्य होतील.

समर्थांचे वाड्.मय रचनेच्या दृष्टीने छंदबद्ध असले तरी शैली आणि आशय या दृष्टीने गद्यप्राय आहे. समर्थांच्या स्वभावाला भाषेचा हळुवारपणा, आशयाचा रसाळपणा आणि रचनेची कोवळीक जणू मानवत नसावी. परंतू समर्थ वाड्.मयाचे सार असलेले 'मनोबोध' प्रकरण मात्र रसाळपणाच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ आहे. व्याकरणाच्या चौकटीतून पाहू गेल्यास या श्लोकांत छंददोष आणि भाषादोष पुष्कळच आहेत. परंतू नियमांनी नियमीत व्हावे असे रामदासी भाषेचे स्वरुप नाही. 'मनोबोध' हे फारच सरस, आशयघन आणि बोधप्रद आहेत. या प्रकरणात समर्थ पूर्ण सामर्थ्यानिशी उभे राहिले आहेत. मनाच्या श्लोकांत समर्थांच्या भाषेची गद्यसदृशता आणि भाषाशैथिल्यही दिसून येते. हे श्लोक आजही जनमानसाकडून स्विकारले जातात त्याचे श्रेय त्याची वृत्तरचना आणि ते श्लोक म्हणण्याची धाटणी याहीकडे जाते.

बहुमोल

समर्थ रामदासांनी ' मनाचे श्लोक' लिहून मराठी साहित्यामध्ये एक योगदान केले आहे. या श्लोकांत दिलेली शिकवण ही कोणत्याच काळात कालबह्य ठरणारी नाही. या श्लोकांत जे विषय आले आहेत ते विषय दीर्घकाळपर्यंत वैचारीक चर्चा घडवून आणू शकतील. मनाचे श्लोक हे विवेकाने विचार करणा–या सर्वसामान्यांचे श्लोक झाले आहेत. विवेकवादाचा विचार याच
या काव्याचे आकर्षण लोकांत जसेच्या तसे राहिलें
काव्यरचनेतून समर्थांनी लोकांपुढे मांडला आहे. तीनशे वर्षानंतर ही राहि आहे. आज विसाव्या शतकातही कितीतरी पुस्तके या विषया संबंधी प्रकाशित व्हावीत हे या विषयांच्या ताजेपणाचे व टवटवीतपणाचे लक्षण आहे. समर्थांचे कवी, तत्वचिंतक म्हणून वाचकाला होणारे दर्शन अत्यंत सात्विक प्रसन्नता देणारे असेच आहे.

*****